दै. तरुण भारत ५ ऑक्टोबर २००७

# कमला महाविद्यालयात हिंदी पखवाडा साजरा

▶कोल्हापूर

ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयात हिंदी पखवाडा साजरा करण्यात आला.

या पखवाड्याचे औचित्य साधुन आयोजित करण्यात आलेल्या विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण समारंभ आकाशवाणी केंद्राचे मानद अधिकारी गोविंद गोडबोले यांच्या हस्ते प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला. यावेळी गोडबोले यांनी विद्यार्थीनींचे कौतुक करुन जनसंपर्क क्षेत्रात युवकांना संधी या क्षेत्रा यशस्वी होण्यासाठी कथकथनाचे कौशल्य प्राप्त करण्याची गरज आहे. असे सांगितले.

या वेळी घेण्यात आलेल्या विज्ञापन कथन, वक्तृत्व, काव्यवाचन, पत्रलेखन, या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या. स्वागत व प्रास्ताविक कु. सुप्रियां कुलकरने केले. अनुराधा भिंगार्डेने पाहुण्यांचा परिचय करुन दिला. कु. विद्या देसाई हीने राष्ट्रपती सौ प्रतिभा पाटील स्त्री गौरव या विषयावर भाषण केले. तर कु. श्वेता कांबळे हीने हमारी हिंदी ही कविता सादर केली.



**कोल्हापूर :** ताराराणी विद्यापीठाच्या कमला महाविद्यालयात हिंदी पखवाडा कार्यक्रमात स्वागत करताना विद्यार्थीनी सोबत गोविंद गोडबोले, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, डॉ. सुमित्रा पोवार आदी

कार्यक्रमाचे नियोजन डॉ. सुमित्रा पोवार यांनी केले. परिक्षक म्हणून प्रा. कमल पाटील, प्रा. कविता बागवे, प्रा. सुमती साळुंखे, डॉ. व्ही. बी. शेळके, प्रा. अनिल घस्ते यांनी काम पाहीले.